बिगर राज्य नागरी सेवेतून (NON-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांकः एआयएस-१३१८/प्र.क्र. ३२ /२०१८/दहा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : **२८.०२.२०१८**

**संदर्भ:-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एमआयएस-१३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२०.०१.२०१८.

**शुध्दिपत्रक: -**

संदर्भाधीन शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.*२ (३)* नंतर परिच्छेद-*२ (४)* नव्याने अंतर्भूत करण्यात येत आहे,-
"४) केंद्र अथवा राज्य शासनाकडून आयोजित / पुरस्कृत / राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने घेतलेल्या प्रशिक्षणाच्या कारणास्तव ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्याच वर्षीच्या उपलब्ध असलेल्या कालावधीच्या उर्वरित गोपनीय अहवालाची प्रतवारी ही त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी.

तसेच केंद्र अथवा राज्य शासनाकडून आयोजित / पुरस्कृत / राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने घेतलेल्या प्रशिक्षणाच्या कारणास्तव एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसेल तर त्यांच्या सदर प्रशिक्षणाचा कालावधी वगळून दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंतचे मागील सलग एकूण १० वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेण्यात यावेत."

**२.** सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०२२८१७०३०९३२०७ असा आहे. हे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2018.02.28 17:46:58 +05'30'

**( मुकेश खुल्लर )**
**अपर मुख्य सचिव (सेवा)**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
९. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
१०. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
११. सर्व मंत्रालयीन विभाग,
१२. निवड नस्ती.